अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

। शनिवार, दि. ४ मे २०२४ ।




# शेतकरी विरोधी भाजपला जागा दाखवा : बारसकर

## वंचित आघाडी उमेदवाराच्या सांगोला तालुक्यात प्रचारसभा

सांगोला/प्रतिनिधी

मागील दहा वर्षात शेतीमालाला हमीभाव न दिल्याने शेतकऱ्यांना आपला शेतमाल कवडीमोल दामाने विकावा लागला आहे. तर मोदी सरकाने शेतकऱ्यांना वेठीस धरणारे तीन शेतकरी विरोधी कायदे संमत करून घेतले होते.ते कायदे रद्द करण्यासाठी भारतातील शेतकरी संतप्त झाले होते. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यासाठी दिल्लीकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना अडविण्यासाठी रस्त्यावर मोठे लोखंडी खिळे मारून सिमेंट काँक्रेटचे बॅरिकेड्स लावण्यात आले होते. तर शेतकऱ्यांवर अश्रू धुराचा वापर ही केला होता.त्यावेळी झालेल्या झटापटीत अनेक शेतकऱ्यांना पोलिसांचा मार खावा लागला होता.त्या ठिकाणी जणू युद्धच सुरू आहे, असे वाटत होते .ही बाब शेतकरी कधीही विसरणार नाहीत. अश्या जगाच्या पोशिंद्या शेतकऱ्यांच्या विरोधात असणाऱ्या भाजपा सरकारला मतदारांनी त्यांची जागा दाखविली पाहिजे. असे मत राज्याचे ओबीसी नेते व वंचित बहुजन आघाडीचे माढा लोकसभेचे उमेदवार रमेश बारसकर यांनी व्यक्त केले.

वंचित चे उमेदवार रमेश बारसकर यांनी माढा लोकसभा मतदार संघातील सांगोला तालुक्यातील कोळा, जुनोनी, हतीद, नाजरे, गौडवडी आदी गावांना भेटी दिल्या त्या प्रसंगी राज्याचे ओबीसी नेते रमेश बारसकर बोलत होते.ते पुढे म्हणाले की,



### दडपशाही मोडीत काढण्यासाठी वंचितच्या मागे या

सांगोला तालुक्यातील प्रस्थापितांनी अवैद्य वाळू उपश्यातून मोठ्या प्रमाणात माया कमवली आहे.आणि त्या पैश्याच्या ताकदीच्या जोरावर सांगोला तालुक्यात मोठ्या प्रमाणात सामाजिक भेदभाव,दडपशाही व दादागिरीचा उच्छाद येथील प्रस्थापितांनी मांडला आहे.जर हे वेळीच नाही थांबले.तर मात्र कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो.त्यामुळे अश्या नाकर्ते सरकारमधील नाकर्ते लोकप्रतिनिधिंना येथील मतदारांनी झिडकारले पाहिजे.तरच ही दडपशाही, दादागिरी बंद होईल.त्यामुळे सांगोला तालुक्यातील दडपशाही ,दादागिरी,सामान्य जनतेच्या अडवणूक व पिळवणूक थांबवायची असेल तर वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी येथील मतदारांनी खंबीरपणे उभे राहावे.

–रमेश बारसकर


शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंजाब, हरियाना व उत्तर प्रदेशातून दिल्लीत येणाऱ्या प्रमुख सीमांवर बॅरिकेड्स, काटेरी कुंपण, मोठे लोखंडी खिळे लावण्यात आले होते. मुख्य मार्ग बंद करण्यात आल्याने दिल्लीच्या सीमांवर आणि शहरात अनेक ठिकाणी वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. शेतकऱ्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर वापर केला होता.

शेतकऱ्यांवर लाठीमार होऊ दे अथवा अश्रुधुराचा मारा होऊ दे, ते मागे हटणार नाहीत. आम्ही सर्व शेतकरी एक आहोत,' असे शेतकऱ्यांनी सांगितले होते.अश्या शेतकऱ्यांवर हल्ला करणाऱ्या, शेतमालाला हमीभाव न देणाऱ्या, खतांच्या किंमती भरमसाट वाढविणाऱ्या, शेतकऱ्यांकडून शासकीय योजनेतून दिल्या जाणाऱ्या शेतीच्या अवजारांवर १८ टक्के जीएसटी घेणाऱ्या जुलमी भाजपा सरकारला आपण निवडणून देणार का ? असा सवाल केला.

# सावे गावातील ग्रामस्थ विकासाला साथ देतील

**मा.आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांचा विश्वास**

सांगोला/प्रतिनिधी



देशाचे भवितव्य आणि देशाचा नेता ठरवण्याची ही निवडणूक आहे. या निवडणुकीत सावे (ता. सांगोला) येथील ग्रामस्थ भूलथापांना बळी न पडता विकासाला साथ देतील आणि महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना गावातून प्रचंड मताधिक्य देतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केला.

खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित गावभेट दौऱ्यात ते बोलत होते. यावेळी खा निंबाळकर यांचे मेहुणे संग्रामसिंह जाधवर, युवासेनेचे संपर्क प्रमुख सागर पाटील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते तानाजीकाका पाटील, सावेचे युवा नेते शाहूराजे मेटकरी, शिवाजी जावीर, दीपक ऐवळे, दीपक दिघे आदी उपस्थित होते. साळुंखे म्हणाले, रणजितसिंह यांच्या माध्यमातून मी, आमदार शहाजीबापू रखडलेल्या सिंचन योजना पूर्णत्वासाठी कटिबध्द आहोत.

एकही गुंठा क्षेत्र शेतीच्या पाण्यापासून आणि नागरिक पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार नाही हेच ध्येय आहे. खासदार हा केंद्रातील सत्तेतील पक्षाचा असेल तर वेगाने विकास होण्यास मदत होते हे आपण गेल्या पाच वर्षांत पाहिले आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




माझं मत चांगल होतं, पण मला त्यांचा अवेळी ''फोन'' आला !

| कल्याण |
|---|
| 145-08-468 |

| मुंबई |
|---|
| 167-40-488 |

# खा.निंबाळकरांना माळशिरस तालुक्यातून १० हजारांचे मताधिक्य

## राजेंद्र गिरमे यांची ग्वाही : खासदार निंबाळकर यांची माळीनगर येथे सदिच्छा भेट

माळशिरस/प्रतिनिधी

अकलूज परिसरातील १९७० पासून असणारी दहशत मी अनुभवतो आहे. या घराण्याने आजोबा पणजोबापासून हे दहशतीचे राजकारण केले आहे. माळीनगर कारखाना कसा बंद पडेल व माळीनगर गाव कसे उद्ध्वस्त होईल याची काही जण काळजी करत आहेत. अशा दहशतीला न घाबरता काम करा आणि खा.निंबाळकर यांना आपल्या तालुक्यातून किमान पाच ते दहा हजाराचे मताधिक्य देण्याचे काम करूया असे मत माळीनगर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी व्यक्त केले.

माढा लोकसभेच्या निवडणुकीच्या



अनुषंगाने माळीनगर येथील राजेंद्र गिरमे यांच्या 'गोकुळ' निवासस्थानी माळीनगर परिसरातील कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी गिरमे बोलत होते.

याप्रसंगी कारखान्याचे पूर्णवेळ संचालक परेश राऊत, के के पाटील, ऍड.भानुदास राऊत, मोहन लांडे, उत्तम खांडेकर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुका कार्याध्यक्ष सागर घाडगे,अक्षय गवळी,शिवसेनेचे राजाभाऊ हिवरकर,जनसेवा संघटनेचे अण्णासाहेब शिंदे,शिरीष फडे,व्यापारी संघटनेचे रिंकू राऊत यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व माळीनगर परिसरातील माळी, नाभिक व मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### विश्वासघातकींना लोक जागा दाखवतील

■ मोदी फडणवीस व माझा विश्वासघात करणाऱ्यांना मतदार जागा दाखवून देतील. कृष्णा भीमा स्थिरीकरणाचा नकाशा घरात लावून उपयोगाचा नाही त्यासाठी फलटण पासून बोगदा सुरू करण्याचे काम मी अमलात आणले आहे. माळशिरस तालुक्यातील दहशतवाद मुळासकट मोडून काढू. तसेच कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी व्यवस्थित केली तर अकलूज परिसरातून चप्पल देखील चोरीला जाणार नाही अशी मी ग्वाही देतो असे मत माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, माळीनगर कारखान्याचे विस्तारीकरण करणे मला गरजेचे असून, येथील नेतृत्वाची ताकद वाढवून कारखान्याला आर्थिक मदत करण्याचा शब्द मी देतो असे सांगितले.


महाराष्ट्र राज्य भटक्या विमुक्त जाती जमाती संचलित नियोजित सर्वोदय समाज मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., च्या वतीने

सभासदांना मार्गदर्शन व स्नेहमेळावा

मार्गदर्शक : अंकूर पंधे सर



चेअरमन भारत जाधव

ओपन समाज प्रकाश वाले

पामलूर समाज नागनाथ मनोहर गायकवाड

लमाण समाज सुभाष चव्हाण

टकारी समाज भारत जाधव

रजपूत भामटा अरुणा वर्मा

कैकाडी समाज राम गायकवाड

छप्परबंद समाज महंमद इंडीकर

बेरड समाज राजू जाधव

उद्योगपती काशिनाथ पांडुरंग जाधव



टकारी समाज पवन गायकवाड

टकारी समाज विनोद जाधव

पामलूर समाज दशरथ गायकवाड

वडर समाज शंकर धोत्रे

दोस्ती ग्रुप नागेश गायकवाड

कडबू समाज चंद्रप्पा छत्रीय

बहुरुपी समाज मल्लेशी सूर्यवंशी

रामोशी समाज अंकुश जाधव

कंची कोरवी समाज अशोक मादगुडी

स्थळ : क्रिमीनल ट्राईब सेंटलमेंट, एम.एस.ई.बी.ऑफिससमोर, चर्च पाठीमागे, आंबेडकर हायस्कूलसमोर, सोलापूर

वेळ : सायंकाळी ५ ते १०

माणुसकी प्रतिष्ठान, त्रिमूर्ती प्रतिष्ठान, सोलापूर